आरबीआय/ २००४-०५/ ३४८

डीसीएम ( आर एम एम टी) क्र. १४०३/ ११.३७.०१/ २००४-०५

जानेवारी १९, २००५

अध्यक्ष व व्यवस्थापक संचालक
सर्व सार्वजनिक/ खाजगी क्षेत्रातील बँका

प्रिय महोदय,

**बँकेच्या शाखांकडून चलनी नाण्यांचा अ-स्वीकार**

कृपया आमची परिपत्रके, डी सी एम (आर एम एम टी) क्र. ४०४/ ११.३७.०१/ २००३-०४ दिनांक ऑक्टोबर ९, २००३ व डीसीएम ( आर एम एम टी )क्र. ११८१/ ११.३७.०१ दिनांक एप्रिल ५, २००४ यांचा संदर्भ घ्यावा. त्यात आम्ही कोणतेही बंधन न ठेवता, जनतेकडून आलेली सर्व किंमतीची चलनी नाणी स्वीकारली जातील याची खात्री करून घेण्याचे आपणास कळविले होते. तथापि देशातील अनेक भागातील अनेक शाखांमधून ती स्वीकारली जात नसल्याच्या तक्रारी आमच्याकडे / सरकारकडे अजूनही येत असून त्याबद्दलचे टिका-लेख वर्तमानपत्रातून येत आहेत. असे ( प्रतिमा काळवंडणारे ) प्रसंग पुनः येणार नाहीत यासाठी आपणस विनंती करण्यात येत आहे की ग्राहकांना अशा तक्रारीसाठी कारण मिळू नये म्हणून आपण आपल्या कर्मचाऱ्यांना याची नियमितपणे जाणीव करून दिली जावी. तसेच केंद्रीय कार्यालयात येत असलेल्या रिपोर्टांचे पुनरावलोकन करण्यासाठी ( तुलना करा- परिपत्रक दि. एप्रिल ५, २००४ चा ४था परिच्छेद ) व शाखांकडून चलनी नाण्यांचा स्वीकाराबाबत तपासणी करण्यासाठी प्रादेशिक / क्षेत्रीय व्यवस्थापकांनी, शाखांना अचानक भेट देण्याबाबत सूचनांचे काटेकोरपणे परिपलन केले जावे.

कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

(यु एस पालीवाल )
मुख्य महाव्यवस्थापक